**International Journal of Advance and Applied Research**
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/**
***Volume-13, Issue-3 | January – February 2026***

**Original Article**

# पंढरपूर तालुक्यातील महिला शेतमजुरांच्या समस्या - एक अभ्यास

**कृष्णा गोविंद गुरव , हर्षवर्धन सोमनाथ मोरे**

*अर्थशास्त्र विभाग, के . बी . पी . कॉलेज. पंढरपूर.*

**Manuscript ID:** IJAAR-B130390
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 3**
**January – February 2026**
**Pp. 587 - 590**

**Submitted:** 21 Jan.2026
**Revised:** 04 Feb. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***Corresponding Author:***
*कृष्णा गोविंद गुरव*

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.20322739

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.20322739

Creative Commons

OPEN ACCESS

***सार:***

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. विसाव्या शतकात शेतीला प्राथमिक क्षेत्र म्हणून ओळखले जात होते. भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा मोठा वाटा आहे. भारतातील सुमारे 68.8 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहे. शेती हा व्यवसाय नसून तो ग्रामीण जीवनाचा आधारस्तंभ आहे. या कृषी क्षेत्रावर पुरुषाच्या बरोबरीने किंबहुना त्यांच्यापेक्षाही जास्त कष्ट उपसणारा घटक म्हणजे महिला शेतमजूर होय.ग्रामीण भागातील पुरुष रोजगाराच्या शोधात शहराकडे स्थलांतर होत असताना शेतीशी संपूर्ण जबाबदारी महिलांच्या खांद्यावर आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेती क्षेत्रावरील सर्व कामे तंत्रज्ञानाच्या जोरावर होताना दिसत आहे. यामुळे सर्व शेतमजुरांच्या रोजगाराला आळा बसताना दिसतोय. शेती क्षेत्राचा विकास होण्यासाठी शेतमजुरांचा मोठा वाटा आहे. शेतमजुराशिवाय शेती करणे शक्य नाही महत्वाचे म्हणजे शेती क्षेत्रावर पुरुषाच्या तुलनेत महिलांचा सहभाग मोलाचा आहे. म्हणूनच या शोध निबंधामध्ये पंढरपूर तालुक्यातील महिला शेतमजुरांच्या वेगवेगळ्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे

***मुख्य शब्द:: महिला शेतमजूर, शेती, अर्थव्यवस्था, ग्रामीण, क्षेत्र. सीमांत मजूर***

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*कृष्णा गोविंद गुरव , हर्षवर्धन सोमनाथ मोरे. (2026). पंढरपूर तालुक्यातील महिला शेतमजुरांच्या समस्या - एक अभ्यास. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 587 - 590.* https://doi.org/10.5281/zenodo.20322739

## महिला शेतमजूर:

पंढरपूर तालुक्यातील महिला शेतमजुरांची संख्या 2011 च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार पंढरपूर तालुक्यात एकूण कार्यरत महिलांपैकी बहुतांश महिला या शेतमजूर म्हणून काम करतात. पंढरपूर तालुक्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिला शेतमजुरांचा वाटा मोलाचा आहे. उजनी धरणाच्या लाभ क्षेत्रामुळे या भागात बारमाही बागायती शेती विकसित झाले असून एकूण कार्यरत महिलांपैकी निम्म्याहून अधिक महिला प्रत्यक्ष शेतमजूर म्हणून काम करतात. बहुतांश महिला या अकुशल मजूर वर्गात मोडत असल्याने तंत्रज्ञानाचा अभाव आणि मजुरीचे अनिश्चित स्वरूप त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणात अडथळा ठरत आहे. पंढरपूर तालुक्यात

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

शेतमजूर महिला 36.73% एवढ्याआढळतात. पंढरपूर मध्ये ग्रामीण भागातील दर 10 काम करी महिलांपैकी साधारण पाच ते सहा महिला या दुसऱ्याच्या शेतात मजूर म्हणून काम करतात. बागायती क्षेत्रामुळे व कोरडवाहू भागापेक्षा येथे महिलांना जास्त दिवस काम मिळते तरीही सीमांत मजूर याच प्रवर्गात जास्त आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) पंढरपूर तालुक्यातील महिला शेतमजुरांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासणे .

२) लिंगभेदामुळे मजुरीवर होणारा परिणाम समजून घेणे .

३) आधुनिक तंत्रज्ञानामुळे महिला शेतमजुरावर झालेला परिणाम अभ्यासणे .

४) महिला शेतमजुरांच्या दैनिक स्थलांतराच्या समस्या अभ्यासणे .

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, अहवाल, वृत्तपत्रे, संकेतस्थळ, इत्यादींचा उपयोग केला आहे.

**तक्ता: पंढरपूर तालुक्यातील महिला श्रमिक व शेतमजूर स्थिती (अंदाजित संदर्भ)**

| कामाचा प्रकार | महिलांची संख्या / सहभाग (अंदाजे %) |
|---|---|
| मुख्य महिला शेतमजूर (ज्यांना वर्षातील ६ महिन्यांपेक्षा जास्त काम मिळते) | ५५% |
| सीमांत महिला शेतमजूर (हंगामी काम करणाऱ्या, उदा. उसाची बाधणी, कापणी) | ३०% |
| स्वत:च्या शेतात काम करणाऱ्या महिला | १०% |
| इतर कृषी संबंधित कामे (दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इ.) | ५% |
| एकूण | १००% |

१. **ऊस शेतीचा प्रभाव:** पंढरपूर तालुक्यात भीमा नदीमुळे बागायती क्षेत्र मोठे आहे. त्यामुळे उसाच्या लागवडीपासून ते तोडणीपर्यंतच्या कामात महिला मजुरांचा सहभाग महाराष्ट्राच्या सरासरीपेक्षा जास्त आहे.

२. **हंगामी मजुरी:** आषाढी आणि कार्तिकी वारीच्या काळात येथील स्थानिक महिला मजुरांच्या कामाच्या स्वरूपात बदल होतो, मात्र उर्वरित काळात त्या प्रामुख्याने नगदी पिकांच्या मजुरीत व्यस्त असतात.

३. **मजुरीचे दर:** सोलापूर जिल्ह्याच्या इतर कोरडवाहू तालुक्यांच्या तुलनेत पंढरपूरमध्ये बारमाही पाणी असल्यामुळे महिलांना वर्षभर कामाची उपलब्धता अधिक असते.

**संशोधन विषयाचे विश्लेषण:**

१) शेतमजुरांची सामाजिक व आर्थिक स्थिती: पंढरपूर तालुका हा भीमा नदीच्या खोऱ्यातील सुपीक जमीन चा पट्टा म्हणून

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

ओळखला जातो. या जमिनीवर सर्वात जास्त उत्पादन घेणारे पीक म्हणजे ऊस आहे. तसेच द्राक्ष डाळिंब या सारखे पिके या तालुक्यात आढळतात. पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्याने येथे भाविकांचे येणे जाणे असल्याने फुले फळे पालेभाज्या या नगदी पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. येथील शेतीवर काम करणाऱ्या शेतमजुरांचा महिलांचा सहभाग मोठा आहे. सर्वत्र या महिला आजही कौटुंबिक अवस्थेत अडकलेल्या दिसतात. आर्थिकदृष्ट्या या महिलांचे उत्पन्न जीवन रोजगारावर अवलंबून आहे. कुटुंबामध्ये एखाद्या निर्णय जरी घ्यायचा असला तरी त्या महिलाला दुर्लक्ष केले जाते. व दुय्यम स्थानाचा दर्जा दिला जातो. कष्टाचे मानाने त्यांचे आर्थिक स्थिती आजही गरिबीच्या रेषेखाली मोडते. कामाच्या बाबतीत महिलांना पुरुषांपेक्षा कमी कष्टाचे कामे दिल्याने त्यांना पुरुषापेक्षा कमी मजुरी दिली जात आहे. शेतातल्या कामावर मर्यादा असल्याने परिणामी मोबदला कमी मिळतो.

२)लिंगभेदामुळे होणारे परिणाम: पंढरपूर तालुक्यातील महिला व पुरुष शेतीमध्ये काढणी असो किंवा द्राक्ष बागांमध्ये एकाच प्रकारचे काम करून देखील महिलांना पुरुषांच्या तुलनेत 30 ते 40% मजुरी कमी दिली जात आहे. पुरुषाचे काम हे कष्टाचे आणि स्त्रियांचे काम हलके असा एक चुकीचा सामाजिक समज मजुरी देताना ठरवताना ग्राह्य धरला जातो. लिंगभेदामुळे केवळ आर्थिक नुकसानच होत नाही तर महिला मजुरांमध्ये न्यूनगंड निर्माण होतो. मजुरीच्या या भेदामुळे महिलांना त्यांच्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अधिक काळ शेतात काम करावे लागते. ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होताना दिसतात.

३) तंत्रज्ञानामुळे महिला शेतमजुरावर झालेला परिणाम: पारंपारिक पद्धतीने शेतीवर केली जाणारे कामे शेतमजुरावरअवलंबून होती पण 21 व्या शतकात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेती क्षेत्रातील सर्व कामे यंत्राद्वारे केली जात आहे ट्रॅक्टर .हायवेस्टर. ब्लोअर आणि आधुनिक फवारणी यंत्रामुळे खुरपणी सारखे कामे कमी झाले आहेत. पुरुषांचे देखील शारीरिक कामे कमी झाली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतामध्ये काम उपलब्ध होत नसल्याने बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे. आधुनिक तंत्र फक्त पुरुषाचे चालवणे आहे यामुळे तंत्रज्ञानाच्या युगात महिला शेतमजूर मागे पडत आहेत. शेती क्षेत्रावर यंत्रा चा वाढता वापर महिला रोजगारावर मर्यादा आणत असल्याचे दिसून येते.

४) दैनिक स्थलांतराच्या समस्या: पंढरपूर तालुक्यातील अनेक गावांमधील महिला शेतमजूर कामासाठी बाहेर गावी जावे लागते. कारण शेतीतील सर्व कामे आता यंत्राद्वारे केली जात असल्याने कामाच्या शोधात शेतमजूर महिला दैनिक जीवनात बाहेरगावी जातात. द्राक्षाच्या हंगामात महिला शेतमजुरांची गरज असते या महिला द्राक्ष बागात काम करण्यासाठी जात असतात द्राक्षाचे घड नाजूक असल्याने येथे यंत्रावर निर्भर न राहता मुजराकडून काम करून घेतले जाते. हे काम करत असता महिला शेतमजुरांना दैनिक स्थलांतर करावे लागते. यात यांच्या येण्या जाण्याचा वेळ जास्त लागतो. घरी उशिरा आल्यामुळे घर कामात वेळ जातो. आणि पहाटेलवकर उठून घराचे काम करून दुसऱ्या गावी जावे लागल्याने त्यांच्या विश्रांतीचा वेळ कमी झाल्याने शेतामध्ये काम करत असताना थकवा जाणवतो. दिवसभर दुसऱ्या गावी असल्याने लहान मुलांना शिक्षणाकडे आणि आहाराकडे हवे तसे लक्ष देता येत नाही. अनेकदा वाहतुकीचा खर्च महिलांच्या मजुरीतूनच कापला जातो आणि प्रवासाच्या अंतरामुळे प्रत्यक्ष कामाचे तास वाढवून हे मोबदला तेवढाच मिळतो.

**निष्कर्ष**:

पंढरपूर तालुक्यातील महिला शेतमजुरांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नाही. लिंगभेद दूर करून त्यांना समान वेतन मिळवून देणे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. स्थलांतरित महिलांसाठी सुरक्षा आणि आरोग्य सुविधा पुरवणे हे शासनाचे आणि समाज व्यवस्थेचे कर्तव्य आहे.

**शिफारसी** :

१) समान काम समान वेतन या कायद्याची ग्रामीण भागात काटेकोर अंमलबजावणी व्हावी.

२) महिला मजुरांना सुरक्षित वाहतूक सुविधा पुरवण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा.

३) महिलांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचे उदा छोटी यंत्रे चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात यावे.

४) गावातील महिलांसाठी स्थानिक पातळीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कामे उपलब्ध करून द्यावीत.

**संदर्भसूची**:

१) देशपांडे. स. ह_ नवी शेती तंत्र आणि शेतमजूर. योजना मासिक

२) निता. एन._महिला रोजगार_ आशेचीअभिलाषा. योजना मासिक पुष्ट क्र 27 ते 33

३) इयत्ता अकरावी अर्थशास्त्र पुस्तक प्रकरण सातवे भारतातील बेरोजगारी .पुष्ट. क्र43ते 49

४) २०११ जनगणना अहवाल

५) शंतु नाथ. यंत्राचे युग. पुष्ट क्र. 49 ते 51

६) जे. एस. मोहितकर_असंघटित क्षेत्रातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास.

७) प्रा. मोनीष कुमार मुळे_वर्धा तालुक्यातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक समस्या

८)जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका, सोलापूर

९)स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) पंढरपूर यांचे वार्षिक अहवाल